# महात्मा गांधीप्रणित सर्वसमावेशक शाश्वत विकासाची साधने – सर्वोदय व सहकार

**डॉ. प्रवीण पी. डांगे**
सहाय्यक प्राध्यापक,
(अर्थशास्त्र विभाग) कर्मवीर हिरे महाविद्यालय,
गारगोटी, जि.कोल्हापूर
Email-pravindange4577@gmail.com

**गोषवारा**

*समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था आणि अर्थव्यवस्था कशी असावी याविषयी समाजवाद, साम्यवाद व भांडवलशाही व्यवस्था मांडणी करतात. पण सर्वोदयाच तत्त्वज्ञान वरील तीन पैलू बरोबरच मानवी जीवनाशी संबंधित इतर पैलुंचाही विचार करते. आज विश्व वेगाने विनाशाकडे वाटचाल करत असताना ते थांबवून नवी दिशा शोधण्याचा प्रयत्न सर्वच क्षेत्रातील विचारवंत करीत आहेत. ही दिशा सर्वोदय तत्वज्ञानात सापडू शकते.*

*भांडवलशाही व समाजवाद जगाचं भलं करू शकत नाही हे सिद्ध झाले आहे. अशा वेळी सर्वोदय हा तिसरा पर्याय आहे. सर्वांचं भलं व कल्याण हेच सर्वोदयाचं ध्येय आहे. विकेंद्रीकरण, विश्वसंस्कृती, यंत्रसंस्कृतीला विरोध, साधनसुचिता या चार स्तंभावर सर्वोदयाचाच तत्त्वज्ञान उभ आहे. सत्य व अहिंसा या दोन शक्तिशाली तारामधून सर्वोदयाचं तत्त्वज्ञान प्रवाहित झालं आजच्या स्थितीत त्याची उपयुक्तता पाहण्याची वेळ आली आहे. तोच अखिल मानव जातीचे कल्याण करू शकतो. याकडे पाठ फिरवणे म्हणजे सर्वनाशाची दिशा धरण्यासारखे आहे. गांधीजींच्या मते जुना विचार आज गवसलेल्या सत्याच्या प्रकाशात खरा ठरत नसेल तर मी तो सोडून देतो हे सर्वोदयालाही लागू आहे.*

***सूचक शब्द (KEY WORD)*** *सर्वसमावेशक, शाश्वत विकास, सहकार, सर्वोदय*

**प्रस्तावना (Introduction):-**

१९०४ मध्ये गांधीजी दक्षिण आफ्रिकेत असताना प्रवासात मित्राने दिलेले बर्ट्रंड रसेलचे 'Unto This Last' पुस्तकाच्या वाचनाने प्रभावित झाले. त्यात रसेलने नफ्यावर आधारित अर्थव्यवस्थेची निंदा केली आहे. अधिक उपभोग हा अर्थव्यवस्थेचा पाया असू नये. अशी अर्थव्यवस्था गरीबाचं कल्याण करू शकत नाही. मर्यादित उपभोग व त्यागावर आधारीत अर्थव्यवस्था हवी आणि श्रमनिष्ठ जीवनच श्रेष्ठ जीवन आहे असा विचार मांडला.

त्या पुस्तकाचे गांधीजीनी भाषांतर करून 'इंडियन ओपिनियन' या साप्ताहिकात क्रमशः छापले. पुढे पुस्तक तयार करून त्याचे नाव सर्वोदय असे ठेवले. त्यातील तत्त्वांचाच त्यांनी जीवनभर अंगीकार केला. स्वतःचे आचरण, प्रयोग, अनुभव आणि चिंतन ह्या आधारे गांधीजीनी सर्वोदय तत्त्वज्ञान विकसित केले.

**अभ्यास विषयाचं महत्व (Importance of study)**

महात्मा गांधीजींच्या सर्वोदय व सहकार या संकल्पना त्याच्या नैतिक व आध्यात्मिक सिद्धांतावर आधारलेल्या आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात शाश्वत व सर्वसमावेशक विकासासाठी सर्वोदय व सहकार याबाबतचे विचार थोडक्यात स्पष्ट केले आहेत.

**अभ्यास विषयाची उद्दिष्ट्ये (Objectives of Study)**

प्रस्तुत शोधनिबंध खालील उद्दिष्ट्ये समोर ठेऊन पूर्ण केला आहे.

१. महात्मा गांधीजीच्या विकाससंबंधीच्या सर्वोदय तत्त्वज्ञानाची आजच्या संदर्भात उपयुक्तता पहाणे.
२. महात्मा गांधीजीच्या ग्रामीण विकासासाठीच्या सहकार संकल्पनेच्या आजच्या परिस्थितीतील उपयुक्ततेचा शोध घेणे.

**गृहितक (Hypothesis)**

महात्मा गांधीजीचे सर्वोदय व सहकार या संकल्पना आजही सर्वसमावेशक, शाश्वत विकासासाठी लागू होतात.

**संशोधन पद्धती (Research Methodology)**

प्रस्तुत शोधनिबंध महात्मा गांधीजीच्या सर्वसमावेशक व शाश्वत विकासासाठीच्या सर्वोदय व सहकार या तत्त्वज्ञानाचे सद्यास्थितीत महत्व अभ्यासणारा आहे. यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. शोधनिबंधासाठी महात्मा गांधीनी लिहिलेल्या, तसेच त्याच्या भूमिकेवर इतरांनी लिहिलेल्या साहित्याचा आधार घेण्यात आला आहे. यासाठी विविध ग्रंथ, लेख, वृत्तपत्रे, इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे. तथ्य संकलनासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा वापर करून प्रस्तुत शोधनिबंध सादर करण्यात येत आहे.

**अ) सर्वोदय**

महात्मा गांधीनी मांडलेली सर्वोदयाची कल्पना तर आर्थिकदृष्या महत्वपूर्ण आहे. तसेच सर्वसमावेशक शाश्वत विकासासाठी ही कल्पना महत्वपूर्ण ठरते. सर्वोदय म्हणजे समाजातील सर्वांचे हित, सर्वांचे कल्याण होय. इतकेच नव्हे तर एकमेकाशी न्यायाने वागावे मिळून मिसळून रहावे म्हणजे सर्वोदय होय. 'एक सर्वांसाठी व सर्वांनी एकासाठी' तन-मन-धनाने कार्य करतील अशा सर्वोदय समाजाची निर्मिती व्हावी. सर्वोदय समाजामध्ये शोषणविरहित,सामाजिक, आर्थिक समानता असेल.

सर्वोदय म्हणजे समाजातील फक्त एका वर्गाचा नव्हे तर सर्व समाजाचा उदय, सर्वांचे हित, सर्वांचे कल्याण, सर्वांचे मंगल म्हणजे सर्वोदय होय. यातूनच अहिंसक मार्गाने समाजवाद आणता येईल असा गांधीजीचा विश्वास होता. सर्वोदय समाज हा आपोआप निर्माण होणार नाही. तर मानवतेची सेवा करू इच्छिणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांची त्यासाठी आवश्यकता असेल. अशा कार्यकर्त्यांनी पुढे येऊन भारतातील लोकांत मोकळेपणाने मिसळावे व गरिबांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती बदलून टाकण्याचा प्रयत्न करावा. गांधीजींच्या नंतर सर्वोदयाचे कार्य विनोबा भावे, डॉ. राजेंद्र प्रसाद व जयप्रकाश नारायण यांनी हाती घेतले व पुढे चालू ठेवले.

"सर्वांना सुख लाभावे, तशी आरोग्य संपदा
कल्याण व्हावे सर्वांचे, कुणी दु:खी असू नये ॥"

ह्या श्लोकातील विचार सर्वोदयाचा मूलाधार आहे.

**सर्वोदयाची आधारभूत तत्त्वे**

**१) विकेंद्रीकरण**

सत्ता व संपत्तीच्या एकत्रीकरणामुळे अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या विकेंद्रीकरणासाठी खादी व ग्रामोद्योगाची संकल्पना मांडली. तर सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी स्वराज्याची संकल्पना मांडली. थोडक्यात सर्वोदयात आर्थिक, सामाजिक, नैतिक स्वातंत्र्य अभिप्रेत आहे.

**२) विश्वस्थवृत्ती (ट्रस्टीशिप)**

स्वतःच्या गरजेपुरते घेऊन इतर संपत्ती लोकांच्या कल्याणासाठी खर्च करावी असा विश्वस्तवृत्तीचा अर्थ आहे. विश्वस्त वृत्ती ही शोषणमुक्तीसाठी अहिंसक पर्याय आहे. म्हणूनच गांधीजी म्हणतात, "निसर्ग मानवाची गरज भागवू शकतो पण हाव नाही.

**३) यंत्र संस्कृतीला विरोध**

गांधीजींचा यंत्राला विरोध नव्हता तर यंत्राच्या वेडाला विरोध होता. यंत्राने श्रमाची बचत होते. असं म्हणायचं आणि हजारोंना बेरोजगार करायचं हा त्या वेडाचाच परिणाम आहे. काहींचे श्रम वाचवण्यापेक्षा यंत्राने सर्वांचे श्रम हालके करणे महत्वाचे, यंत्रवेडाने संपत्तीचे केंद्रीकरण होते. मुठभर माणसे अनेकांना दास बनवतात. म्हणून यंत्रसंस्कृतीला त्याचा विरोध होता. यंत्रसंस्कृतीमध्ये मानवता, स्वतंत्रता, समता, बंधुता यांना स्थान नाही. प्रत्येक देशाने उत्पादन तंत्राची निवड करताना आंधळेपणा ऐवजी अर्थव्यवस्थेचा विचार करून उत्पादन तंत्राची निवड करावी.

**४) साधनशुचिता**

साधनशुचितेला साध्य-साधन विवेक असेही म्हणतात. गांधीजींच्या मते साध्य जितके पवित्र आणि उच्च असेल, तितकेच उच्च आणि पवित्र साधन वापरले पाहिजे. हा विवेक ठेवला नाही तर साध्याचीही हानी होते अन्याय, अत्याचार आणि शोषणाचा अंत करून सर्वांचं कल्याण साधन हे त्याचं साध्य आहे. आणि त्यासाठी त्यांनी हृदय परिवर्तन, गुणविकास आणि अहिंसक सत्याग्रह चिरस्थायी करते.

सर्वोदयाचं भवन वरील चार स्तंभावर उभारले आहे. त्याच छत आहे. व्रतविचाराचं हे छतच सर्वोदयाच्या

तत्त्वज्ञानाला सुरक्षित ठेवत आणि त्याच्या भिंती आहेत रचनात्मक कार्यक्रमाच्या.

कार्ल मार्क्सने समानवादामध्ये परिस्थिती परिवर्तनावर भर दिला आहे. तर गांधीजीनी सर्वोदयात व्यक्तीपरिवर्तनावर भर दिला आहे. हा मुलभूत फरक दोघात आहे.

**ब) सहकार (Cooperation)**

महात्मा गांधीजींच्या मते भारताचा विकास करावयाचा असेल तर सहकाराची ध्येय धोरणे तळागाळातील खेड्यातील गरीब व्यक्तीला डोळ्यासमोर ठेऊन नियोजन करणे आवश्यक आहे.

'एक सर्वांसाठी व सर्व एकासाठी' या तत्त्वावरच आर्थिक विकासाचे धोरण व्हावे. मानव हा समाजशील प्राणी असून त्यांच्या प्राथमिक गरजा समाजातूनच पूर्ण होण्याची अपेक्षा असते. याकरिता प्राचीन काळापासून एकमेकांच्या गुणाचे व कौशल्याचे संकलन करून समाजाच्या विकासामध्ये मौलिक सहकार्य करणे हे लोकशाही विकासाच्या दृष्टीने आवश्यक आहे. म्हणून प्रत्येकाने स्वतंत्रपणे कार्य करण्यापेक्षा सर्वांनी आपली बुद्धी, कुशलता, पैसा, श्रम यांच्या एकत्रित कार्यातूनच विकासाची निर्मिती योग्य पद्धतीने करणे आवश्यक आहे.

कोणत्याही देशाची संपन्नता ही त्या देशाची लोकसंख्या किती प्रमाणात आहे यावरून ठरत नसून त्या देशातील कुपोषित, दारिद्याखाली जगणाऱ्या लोकांची संख्या कमीत कमी ठेवण्यासाठी काय उपाययोजना केल्या आहेत हे महत्वाचे. यासाठी सहकाराच्या तत्वांचा वापर करणे आवश्यक आहे असे गांधीजीनी आपल्या विचारातून व्यक्त केले आहे.

**निष्कर्ष (Conclusion)**

१) खेड्याचे स्वावलंबन, सर्वोदय, ग्रामोद्योग यासारख्या संकल्पनी पूर्वीच्या काळी खेडी स्वयंपूर्ण होती. आज भारताच्या खेड्यात या संकल्पना रुजल्या पाहिजेत. यातूनच महाराष्ट्रात राळेगणसिद्धी, हिवरे बाजार इ. सारखी आदर्श खेडी बनतील.

२) गांधीजींची सर्वोदय व विश्वस्तवृत्ती या संकल्पना मानवी कल्याणात भर टाकणारा असून आर्थिक, सामाजिक समता निर्माण करणाऱ्या आहेत.

३) भारत खेड्यांचा देश असल्यामुळे त्याच्या विकासासाठी खादी, कुटीर आणि लघु उद्योग खूप महत्वाचे आहेत. ज्यातून लोकांचा सामाजिक व आर्थिक विकास घडून येतो. त्याच्या वाढीसाठी आजही सरकार व इतरांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

४) गांधीजीच्या विचाराची गरज भारत ह्या खेड्याच्या देशाला तर आहेच. शिवाय, एखादे राष्ट्र मानवी मुल्यांच्याद्वारे पुढे यायचे असेल तर त्याला गांधी विचाराची जोड दिली पाहिजे.

५) गाधीजींचे काही अर्थविषयक विचार व्यावहारिक पातळीवर न येता आदर्शाच्या पातळीवरच राहील राहिले.

असे असले तरी सर्वसमावेशक शाश्वत विकासासाठी सर्वोदय व सहकार ह्या संकल्पना आजही उपयुक्त आहेत.

**समारोप**

समष्टीच्या व्यापक हितामध्येच व्यक्तीचे हित निहित असते. या बर्ट्रंड रसेलच्या गृहितावर गांधीजींचे सर्वोदय तत्वज्ञान आधारित आहे जे विश्वासाठी तारक आहे.

गांधी विचार मुक्त विचार असून तो परिवर्तनशील आहे हे त्याचे मुख्य वैशिष्ट्य आहे. आजही अहिंसक सत्याग्रहाचा, शोषणरहित समताधिष्टीत शाश्वत समाजाची स्थापना सर्वोदय करू शकतो यासाठी अर्थव्यवस्था व सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा आग्रह व अंमलबजावणी केली पाहिजे.

**संदर्भसाहित्य**

१) धर्माधिकारी दादा, सर्वोदय दर्शन, परमधाम प्रकाशन, पवनार (जुलै, २००९)

२) सोर वासंती, एकविसाव्या शतकात गांधी, परमधाम प्रकाशन (ग्रामसेवा मंडळ), पवनार २०१३.

३) पांढरीपांडे सु.श्री., धृवपद, चेतश्री प्रकाशन, मुक्ताई, अमळनेर, १९९२.

४) कर्दळे आशा, विदेशातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ, चक्रवर्ती प्रकाशन, १९९३.

५)'RESEARCH JOURNEY' International E-Research Journal, Issue 164-Mahatma Gandhi's Thoughts & Its present relevance (ISSN-2348-7143) March 2019.

६) www.research.com

७) www.mkgandhi.org

८)http://en/wikipedia.org/wiki/Gandhian Economic

९) शर्मा सुषमा, 'गांधीजींच्या वैज्ञानिक दृष्टीच्या प्रकाशात' दै.सकाळ (कोल्हापूर आवृत्ती) २८ फेब्रुवारी २०१९.